THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 21st MARCH 1895.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

**सन १८८९ चा हिंदुस्थानचा बंदरांबाबत आक्ट सुधारण्याकरितां आक्टाचा मसुदा.**

ज्याअर्थी सन १८८९ चा हिंदुस्थानचा बंदरांबाबत आक्ट सुधारणें इष्ट आहे, त्याअर्थीं ह्यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

सन १८८९ च्या १० व्या आक्टाचें ६ वें कलम सुधारण्याविषयीं.

१. (१) सदहू आक्टाचें कलम ६, पोटकलम (ओ), ह्यांतला "आणि" हा शब्द गाळून, त्याच कलमाच्या (पी) रकमेनंतर खालील मजकुर जास्त दाखल करावा; तो येणेंप्रमाणें:—

"आणि

(क) अशा कोणत्याही बंदरांतील तारवांच्या मालकास अगर मास्तरास,—

(१) अमलदार व खलाशी ह्यांच्या राहाण्याच्या जागांवर सूर्याचे किरण न पडूं देण्यासाठीं दुहेरी छतें व पडदे करण्यास;

(२) अमलदारांच्या व खलाशांच्या राहावयाच्या जागांमध्यें हवा खेळविण्यासाठीं, त्यावेळीं तारवास असलेल्या जंग्यांच्या अगर डेकवरील द्वारांच्या मानानें जितके विंडसेल [तारवाच्या अंतर्भागीं हवा पोंचविण्यासाठीं लावतात ते कापडाचे नळ] वापरतां येण्यासारखे असतील तितके विंडसेल उभारण्यास;

(३) तारवाचें डेक लोखंडाचें केलेलें असून तें लांकडानें मढविलेलें नसल्यास तें लांकडी फळ्यांनीं आच्छादित करण्यास;

(४) खलाशी वापरीत असलेली जागा आणि भटारखाना ह्यांच्यामध्यें पातळ लोखंडी पत्र्याची मात्र पडदी असेल तेव्हां, ती जागा व तो भटारखाना ह्यांच्यामध्यें एखाद्या योग्य उष्णताअवाहक पदार्थाची पडदी बसविण्यास—

हुकुम करून त्या तारवांचे अमलदार व खलाशी ह्यांचें उष्णतेपासून संरक्षण होई असा बंदोबस्त करण्यासाठीं."

## हेतु व कारणें ह्यांचें निरूपण.

हिंदुस्थानच्या बंदरीं येणाऱ्या कांहीं तारवांच्या व मुख्यत्वेंकरून मालाच्या तारवांच्या फोरक्यासलांत व अमलदारांच्या राहावयाच्या जागांत हवा खेळण्याची आणि त्यांचें सूर्याच्या उष्णतेपासून संरक्षण करण्याची योग्य व्यवस्था केलेली नसते ही गोष्ट सन १८९२ सालीं सरकारच्या नजरेस आणून दिल्यावरून त्याबद्दल सेक्रेटरी आफ् स्टेट ह्यांच्या मार्फत बोर्ड आफ् ट्रेडकडे लिहिण्यांत आलें होतें. त्यावर, तारवांतले ते दोष निघतील अशा रीतीनें आपल्या नियमांत फेरफार करण्याची आपली तयारी आहे असें त्या बोर्डानें लिहून पाठविलें, परंतु त्यांनीं सरकारास असेंही कळविलें कीं, असे फेरफार ज्यावेळीं करण्यांत येतील त्याच्या आधींच्या वेळेपासून ते लागू होतील असें ठरविणारा कायदा नसल्याकारणानें आणि तसा कायदा लवकर होण्याचा रंग दिसत नसल्याकारणानें, आह्मीं असे फेरफार केले तरी ते फेरफार, जीं तारवें, सन १८६७ चा व्यापारी तारवांबावत आक्ट, कलम ९, पोटकलमें (४) व (७) (आतां सन १८९४ चा व्यापारी तारवांबावत आक्ट, परिशिष्ट ६ वें, रेग्युलेशन (३) व (९) पाहा) ह्याअन्वयें पहिल्यानें अगर पुनः नोंदलीं जातांना आमच्या सर्व्हेयरांकडून तपासलीं जातील, त्यांस मात्र लागू होतील. ह्यावरून अशी सूचना करण्यांत आली कीं, इंग्लंडांत कायदा होण्याच्या आधीं, सन १८८९ चा हिंदुस्थानचा बंदरांबाबद आक्ट सुधारून त्यांत, तारवें हिंदुस्थानच्या बंदरांमध्यें असतांना त्यांमध्यें सदरील बाबतींच्या संबंधानें आवश्यक असेल ती व्यवस्था करण्याविषयीं ज्यावरून हुकुम करितां येईल, अशा कानू करण्याबद्दल ठराव दाखल करावा. आणि हा मसुदा त्या सूचनेप्रमाणें त्या कायद्यांत फेरफार करण्यासाठीं तयार केला आहे.

तारीख १९ माहे फेब्रुआरी सन १८९९.

(सही) जे. वेस्टलंड.

(True Translation.)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

BOMBAY : PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS